दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.
RNI No.MAHMAR/2019/79184
www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com
धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २७६ वा | मंगळवार दि. १ ऑगस्ट २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## मुंबई-जयपूर सुपरफास्ट एक्सप्रेसमध्ये गोळीबाराचा थरार



**मुंबई ।** मुंबई जयपूर सुपरफास्ट एक्स्प्रेस या लांब पल्ल्याच्या ट्रेनमध्ये रेल्वे सुरक्षा बळ अर्थात आरपीएफच्या हवालदाराने गोळीबार केला. यामध्ये आरपीएफचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक टीकाराम मीणा यांच्यासह तीन प्रवाशांचा मृत्यू झाला. जयपूर एक्सप्रेसच्या एकूण तीन डब्यांमध्ये गोळीबार झाला. पँट्री कारमध्ये आरपीएफचा हवालदार चेतन कुमार चौधरीने गोळीबार केला. चेतनने या प्रवाशांना शोधून गोळ्या झाडल्याची शक्यता आहे. आरोपी चेतन हा मुंबई सेंट्रल आरपीएफमध्ये तैनात आहे.

## न्यूज कॉलम

### संसारोपयोगी साहित्याची चोरी

**धुळे ।** शिरपूर शहरातील मांडळ शिवारातील संतोष देवराम पाटील यांच्या महावीर सेक्टर नं.१, प्लॉट नं.५३ या बंद घरात अज्ञात चोरट्याने संसारपयोगी घरफोडी करत साहित्यासह मुद्देमाल चोरून नेला. दि.२८ रोजी मध्यरात्री ते दि. २९ च्या पहाटे दरम्यान ही घटना घडली. चोरट्याने घराचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. कपाटातून चार साड्या, १५ हजार रूपये रोख, गॅस सिलिंडर व २० हजार रुपये किमतीचा टॅब असा ४१ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल चोरून पोबारा केला. या प्रकरणी शिरपूर शहर पोलिस ठाण्यात भादंवि कलम ४५७, ३८०, ४५४ व ४२७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास एल. एस. पाटील करत आहेत.

### मृत्यूप्रकरणी तीन संशयित कारागृहात

**धुळे ।** अवधान एमआयडीसीतील कंपनीत काम करणाऱ्या महिलेचे अपहरण करून मारहाण करण्यात आली होती. त्यात तिचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी तीन संशयितांची न्यायालयीन कोठडीत रवाणगी झाली आहे. शीतल व्यवहारे यांचे संशयितांनी अपहरण करत मारहाण केली होती. यात त्यांचा मृत्यू झाला होता.

# राज्यभरात संताप : भिडेंविरोधात नाशिक, संगमनेर, पुण्यात आंदोलन

### काँग्रेस, राष्ट्रवादीसह समता परिषदेचे पदाधिकारी आक्रमक

**नाशिक । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने मनोहर भिडे यांच्या विरोधात महाराष्ट्र राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक सरंक्षण मंत्री छगन भुजबळ व माजी खासदार समीर भुजबळ यांच्या सुचनेनुसार काल दि. ३१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे आंदोलन करण्यात आले. त्यानंतर यावेळी उपजिल्हाधिकारी पारध्ये यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी निवेदनात म्हटले की, महात्मा गांधी हे भारताचे राष्ट्रपिता असून त्यांच्या बद्दल अपशब्द वापरणे हा देशद्रोहाचा गुन्हा ठरतो. मनोहर भिडेंनी महात्मा गांधी यांच्याबाबत अत्यंत निंदा नालस्ती करणारे विधान केल्याने समाजात तेढ निर्माण करणाऱ्या संभाजी भिडेंना अटक करावी. समाजात तेढ निर्माण करणारी वक्तव्ये करण्याचा त्यांनी यापुर्वीही प्रयत्न केला आहे. संभाजी भिडे हे प्रत्येक वेळी अनेक महापुरुषांबद्दल अपशब्द वापरून तरुणांची माथे भडकावून दिशाभूल करत आहे असा आरोप करण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून भिडे अशी चिथावणीखोर वक्तव्ये करत आहेत. भिडे जातीवाचक वक्तव्य करत असल्याने दोन समाजात जातीय तेढ निर्माण होऊन दंगली घडू शकतात. जगात ख्याती असणाऱ्या राष्ट्रपित्याबद्दल अशी वक्तव्ये करणाऱ्या मनोहर भिडें विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून समाजात तेढ निर्माण करून दंगलीचे बीज पेरणाऱ्या भिडेंना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे, जिल्हाध्यक्ष रविंद्र पगार, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब कर्डक, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, नानासाहेब महाले, महिला शहराध्यक्षा योगिता आहेर, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद शहराध्यक्ष कविता कर्डक, आशा भंदुरे, पूजा आहेर, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष समाधान जेजुरकर, गौरव गोवर्धने, ज्ञानेश्वर दराडे, संजय खैरनार, निवृत्ती अरिंगळे, मनोहर कोरडे, शंकर मोकळ, अमोल नाईक, सुनिल अहिरे, शंकरराव पिंगळे, भगवान भंदगे, नाना पवार, योगेश दिवे, योगेश निसाळ, विनोद डोके, नाना साबळे, संतोष भुजबळ, मुरलीधर भामरे, जीवा बच्छाव, दिपक खैरनार, एकनाथ पाटील, संजय मोरे, कैलास खैरनार, ज्ञानेश्वर नाईकवाडे, रितेश केदारे, सोनू वायकर, प्रशांत वाघ, किरण भावसार, गणेश सुर्यवंशी, अकिल खान, पोपटराव जेजुरकर, श्रीराम मंडळ, रंजना गांगुर्डे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.






### धुळ्यात संभाजी भिडे यांच्या पुतळ्याचे दहन

**काँग्रेस महापुरूषांबद्दल वादग्रस्त विधान केल्याने विविध संघटनांच्या वतीने शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे प्रमुख संभाजी भिडें विरोधात निदर्शने करण्यात आली. यासंदर्भात राज्यभरातील राजकीय नेत्यांसह विविध शहरातील लोकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. यावेळी लोक क्रांतीचे संस्थापक अध्यक्ष देवेंद्र पाटील, संस्थापक कार्याध्यक्ष आप्पासाहेब बी एन बिरारी, जिल्हाध्यक्ष आसाराम माळी, शेतकरी आघाडीचे बापुसाहेब माळी, युवाजिल्हाध्यक्ष पवन माळी, शिक्षक आघाडीचे चव्हाण, सेवानिवृत्त कृषी सहायक संतोष खैरनार, सुनिल चौधरी, मधुकर माळी, कैलास बागुल,आर एस महाजन, कैलास रोकडे, जितु बिरारी आदी उपस्थित होते.**

### पुण्यात अजित पवार गटाच्या वतीने निदर्शने

**मनोहर उर्फ संभाजी भिडे याने राष्ट्रपिता महात्मा गांधी, महात्मा जोतिराव फुले आणि देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व समाजसुधारक यांच्याबाबतीत केलेल्या गैरवक्तव्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जोरदार निदर्शने करुन निषेध करण्यात आला. भिडे याला या अवमानकारक वक्तव्याबद्दल अटक करुन कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणीही यावेळी करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे, जिल्हाध्यक्ष रविंद्र पगार, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब कर्डक, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, नानासाहेब महाले, महिला शहराध्यक्षा योगिता आहेर, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे शहराध्यक्ष कविता कर्डक, आशा भंदुरे, पूजा आहेर, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष समाधान जेजुरकर, गौरव गोवर्धने, ज्ञानेश्वर दराडे, संजय खैरनार, निवृत्ती अरिंगळे, मनोहर कोरडे, संतोष भुजबळ, रंजना गांगुर्डे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## शालेय शिक्षण मंत्र्यांचे 'ते' विधान वैज्ञानिक दृष्टिकोनाशी पूर्णपणे विसंगत

### महाराष्ट्र अंनिसचा आरोप, विधान मागे घेण्याचे आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण मंत्री आणि कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री दिपक केसरकर यांनी दोन दिवसांपूर्वी नाशिक येथील पत्रकार परिषदेत सांगितले की, कोल्हापूर येथील पूर परिस्थितीच्या वेळी ते शिर्डीत होते. तेथे त्यांनी प्रार्थना केली. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी धरणाचे दरवाजे उघडले तरीही, पुराच्या पाण्याची पातळी वाढली नाही. एरवी धरणाचे दरवाजे उघडले तर पाण्याची पातळी दोन फूट किंवा त्यापेक्षा जास्त वाढते. मात्र केवळ ते शिर्डीत असल्याने धरणाचे दरवाजे उघडले तरीही पाण्याची पातळी वाढली नाही आणि त्यामुळे गावे पाण्याखाली गेली नाहीत. पुढे ते असेही म्हणाले की याला अंधश्रद्धा म्हणा, श्रद्धा म्हणा किंवा काहीही म्हणा पण जे घडले ते सर्वांनी पाहिले. असा अजब आणि चमत्कारसदृश्य दावा केसरकर यांनी केला.

खरं तर, शालेय शिक्षण मंत्री या अतिशय जबाबदारीच्या संवैधानिक पदावर आरूढ असलेल्या व्यक्तीने असा अवैज्ञानिक, भंपक दावा करणे हे पूर्णतः चुकीचे आहे. शिवाय राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मूलभूत गाभा घटकात अंतर्भाव असलेल्या तसेच मूल्य शिक्षणातही ज्याचा जाणिवपूर्वक समाविष्ट करण्यात आलेला आहे आणि भारतीय राज्यघटनेमध्ये ५१ क मध्ये शोधक बुद्धी, मानवतावाद आणि वैज्ञानिक दृष्टीकोन याचा अंगिकार, प्रचार आणि प्रसार करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे मूलभूत कर्तव्य सांगितलेले आहे. अशा वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्याशी मंत्री महोदयांचे विधान पूर्णपणे विसंगत व आक्षेपार्ह आहे असा आरोप अंनिसने केला आहे.

म्हणून मंत्री महोदयांनी त्यांचे हे अवैज्ञानिक विधान मागे घेत असल्याचे जाहीर करून दिलगिरी व्यक्त करावी, अशी मागणी महाराष्ट्र अंनिसच्या वतीने पत्राद्वारे त्यांच्याकडे करण्यात येत असल्याचे अंनिसचे राज्य प्रधान सचिव डॉ. टि.आर. गोराणे व राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी कळविले आहे.



## मणीपूर घटनेच्या निषेधार्थ दहिवेल गावात कडकडीत बंद

**पिपळनेर । प्रतिनिधी**

धुळे जिल्हा महाराष्ट्र राज्य आदिवासी बचाव अभियान व इतर सामाजिक संघटनांनी साक्री तालुक्यातील दहिवेल येथे मणिपूर येथे घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ सर्व समावेशक बंद पुकारण्यात आला. यावेळी निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले. परिसरातील सर्व समाज बांधव व दहिवेल गावातील सर्व समाज बांधव व व्यापारी बांधव राजकीय, सामजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्व राजकीय सामाजिक कार्यकर्ते यांनी घटनेचा तीव्र निषेध केला व जनतेचया तीव्र भावना शासन दरबारी पोहचणयाकामी साकी पोलिस निरीक्षक यांना निवेदन दिले आहे. सदर वेळी साक्रीचे पोलीस उपअधीक्षक सोनवणे, साक्री पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक निकम यांनी शांततेचे आव्हान करून चोख बंदोबसत ठेवला.निधेष मोर्चा सांगता वेळी मणिपूर येथील घटनेत मृत्युमुखी पडलेल्या बांधवांना व बहिणींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## आ.फारुख शाह यांच्या हस्ते लुंबिनी बुद्ध विहार येथे कॉंक्रीटीकरण कामाचा शुभारंभ



**धुळे । प्रतिनिधी**

महानगर पालिका क्षेत्रात सोई सुविधा विकास योजने अंतर्गत गोदाई कॉलनी, साक्री रोड येथील लुंबिनी बुद्ध विहार येथे कॉंक्रीटीकरण व पेव्हिंग ब्लॉक कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी लंबिनी बुद्ध विहार समितीच्यावतीने आ.फारुख शाह यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी आ.फारुख शाह यांच्यासोबत डॉ. दीपश्री नाईक, निजाम सैय्यद,प्यारेलाल पिंजारी,आसिफ शाह, डॉ.बापुराव पवार,भैय्यासाहेब पवार अर्जुन गायकवाड, प्रा. विजय पवार,राजेंद्र बोराळकर, विनय सूर्यवंशी,साहेबराव लोंढे, दिलीप गुलाले, केशव जगदेव, इंजि. धर्मेंद्र झाल्टे, विनोद चव्हाण, शरद भामरे,गौतम भामरे, निर्मला पवार, लता मयराळ,नूतन गांगुर्डे, कल्पना बोराळकर,रवींद्र सूर्यवंशी, अरुण मयराळ,फकिरा बागवान,सलमान अन्सारी आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## भीमस्मृती यात्रेनिमित्त अभिवादनासाठी लोटला जनसागर



**धुळे । प्रतिनिधी**

मुंबई- आग्रा महामार्गावरील लळिंग (ता. धुळे) कुरणातील ऐतिहासिक लांडोर बंगला येथे सोमवारी (ता. ३१) आंबेडकरी अनुयायींचा जनसागर लोटला. भीमस्मृती यात्रेनिमित्त दिवसभर विविध कार्यक्रम पार पडले. न्यायालयीन कामकाजानिमित्त येथे आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३८ मध्ये लांडोर बंगल्यास भेट दिली होती. त्यांच्या या आठवणींना उजाळा देण्यासाठी ३० वर्षांपासून लांडोर बंगलास्थळी दरवर्षी ३१ जुलैला भीमस्मृती यात्रा भरते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ३१ जुलै १९३८ मध्ये न्यायालयीन कामकाजासाठी शहरात आले होते. त्या वेळी त्यांनी लांडोर बंगला येथे मुक्काम केला होता. त्यांची आठवण स्मरणात राहावी, यासाठी माजी प्राचार्य स्व. जे. जी. खैरनार यांच्यासह काही कार्यकर्त्यांनी भीमस्मृती यात्रा भरविण्यास सुरवात केली. हा उपक्रम अखंडित सुरू आहे.

यावेळी आ.फारूक शाह, पोलिस अधिक्षक संजय बारकुंड, ज्येष्ठ नेते शशिकांत वाघ, संजय बैसाणे, राज चव्हाण, राजु शिरसाठ, आबा खंडारे, संजय बैंसाणे, नैना दामोदर, बानु शिरसाठ, सिध्दार्थ जगदेव,मिलींद बैसाणे,ॲड.मधुकर भिसे, यांच्यासह विविध पक्ष- संघटनांकडून डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या या आठवणींना उजाळा देण्यासाठी लांडोर बंगलास्थळी दरवर्षी ३१ जुलैला भीमस्मृती यात्रा भरते. भीमस्मृती यात्रेचे हे ३० वे वर्ष आहे. सकाळपासूनच आंबेडकरी अनुयायींनी लळींग कुरणातील ऐतिहासिक लांडोर बंगला येथे गर्दी केली. धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक जिल्ह्यासह शेजारील गुजरात, मध्यप्रदशोतूनही अनुयायी दाखल झाले.. मोहाडी पोलिस ठाण्यातर्फे ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांसाठी लांडोर बंगला येथे जाण्यासाठी वाहनाची व्यवस्था करण्यात आली होती. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (खरात) पक्षातर्फे अन्नदान व वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला. तर लांडोर बंगला मध्यवर्ती समितीतर्फे प्रबोधनात्मक गायनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## गोदावरी नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी सर्व यंत्रणांनी गतीने काम करावे

### मनपा आयुक्त करंजकर यांचे आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी**



गोदावरी नदी संवर्धनाबाबत मनपा स्तरावर प्रशासक तथा आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांच्या अध्यक्षतेखाली मासिक बैठक काल रोजी आयुक्त यांच्या दालनात पार पडली. बैठकीत अनेक विषयावर चर्चा झाली. गोदावरी नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी सर्व यंत्रणांनी गतीने काम करून प्रलंबित कामे पूर्ण करावीत. रामकुंड परिसर येथे संपूर्ण भारतातून लोक, भाविक धार्मिक पूजा विधी-मार्ग करण्यासाठी येत असतात त्यामुळे तेथील परिसराची नियमित स्वछता ठेवण्याच्या सूचना आयुक्तांनी संबधीत विभागाला दिल्यात.

रामकुंड परिसरात जमा होणारे निर्माल्य टाकण्यासाठी निर्माल्य कलश उपलब्ध करून देणे व्यवस्था करणे, जे नागरिक गोदावरी नदीत कपडे अथवा गाड्या धुतांना आढळल्यास त्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करणे, पूररेषेवरील असलेले बांधकाम व तसेच नदी किनारी असलेले अतिक्रमण काढण्याच्या सूचना अतिक्रमण उपायुक्त यांना देण्यात आल्या आहे. तसेच गोदावरी पुलावरून नागरिक नदी पात्रात निर्माल्य तसेच पूजेचे साहित्य टाकत असतात त्यासाठी त्या परिसरात निर्माल्य कलश ठेवून निर्माल्य संकलन करणे, शहरातील सर्वच पुलाना संरक्षक जाळ्या लावणे, नदी किनारी बांधकामाचे वेस्ट मटेरियल टाकणाऱ्या संबंधित व्यक्तीवर कारवाई करणे. तसेच नदी पात्रात वाढलेली पानवेली काढण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या.

तसेच गोदावरी संवर्धनासाठी लहान मुलांमध्ये जागरूकता यावी यासाठी शिक्षण विभागाने पुढाकार घेऊन नाशिक मनपाच्या १०० शाळा व २५० खाजगी शाळामध्ये गोदावरी संवर्धन गीत ऐकवले जावेत. तसेच जनसंपर्क विभागातर्फे गोदावरी संवर्धनासाठी जनजागृती करण्याच्या सूचना यावेळी प्रशासक तथा आयुक्त डॉ.अशोक करंजकर यांनी दिल्या. या बैठकीस नाशिक माहिती उपसंचालक ज्ञानेश्वर इगवे, उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे, उपायुक्त नितीन नेर, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंत मोरे, शहर अभियंता शिवकुमार वंजारी, अधीक्षक अभियंता यांत्रिकी व मलनिःसारण विभागाचे उदय धर्माधिकारी, सहा.संचालक नगर नियोजन विभागाचे कल्पेश पाटील, घनकचरा संचालक डॉ.कल्पना कुटे, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, शिक्षण अधिकारी बी.टी. पाटील, राजेंद्र शिंदे, अमर परचुरे, अशासकीय सदस्य निशिकांत पगारे आदी अधिकारी उपस्थित होते.

## विजेचा शॉक लागून शेतकऱ्याचा मृत्यू

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

जुने कोळदे ता. शिंदखेडा शिवारातील तापी नदीच्या काठावर विद्युत मोटर सुरू करतांना विजेचा धक्का लागून लंघाणे ता. शिंदखेडा येथील शेतकर्याचा आज दि.३० रोजी साडेनऊ वाजेदरम्यान जागीच मृत्यू झाला.

जितेंद्र रमेश पाटील (वय ३५) असे मृत शेतकर्याचे नाव आहे.जितेंद्र पाटील यांची लंघाणे गावाच्या शेत शिवारात त्यांची शेतजमीन आहे. रविवार सकाळी शेतात फवारणी करण्यासाठी पाण्याच्या टाकी भरण्यासाठी लंघाणे तापी नदी काठावर विद्युत मोटार सुरू करण्यासाठी ते गेले होते. अचानक तिथे विजेचा धक्का लागूल जितेंद्र पाटील हे खाली कोसळले. ही बाब घरच्यांच्या लक्षात येताच तातडीने त्यांना दोंडाईचा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. पारुल अग्रवाल यांनी तपासून मृत घोषित केले. उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करून शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. याप्रकरणी दोंडाईचा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## योग्य निर्णय

गेले तीन महिने मणिपूर अशांत आहे. तरीही मुख्यमंत्री बिरेन सिंग पदावर आहेत. तेथील तपास सीबीआयकडे देण्याचा निर्णय योग्य असला, तरी तो राजकीय अगतिकतेतून घेतला आहे का?

मणिपूरमधील हिंसाचार व त्यातही तेथे दोन महिलांवर झालेल्या अत्याचाराची केंद्रीय गुप्तचर विभागातर्फे (सीबीआय) चौकशी करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. तसेच या संदर्भातील खटले मणिपूरबाहेर हलवण्यासाठी केंद्राने सर्वोच्च न्यायालयाची परवानगी मागितली आहे. या दोन्ही बाबींचे स्वागत झाले पाहिजे. मणिपूरमध्ये उसळलेल्या हिंसाचाराने सर्व देश चिंतेत आहे. तेथे दोन महिलांवर ज्या पद्धतीने अत्याचार झाले, त्यामुळे देशात संतापाची लाट उसळली. तीन मे रोजी तेथे मोठ्या प्रमाणावार हिंसक घटना घडू लागल्या. महिलांची विवस्त्र धिंड काढणे व त्यांच्यावर अत्याचार होणे ही घटना चार मे रोजी घडली. असे स्थानिक पोलिसांनी सांगितले. मात्र, गुन्हा दाखल झाला १८ मे रोजी. त्या दुर्दैवी घटनेची चित्रफीत समोर आल्यानंतर, सुमारे अडीच महिन्यांनी पहिली अटक झाली. महिलांवर हल्ला करणारा जमाव मोठा असला, तरी त्या घटनेचे चित्रीकरण करणार्यांसह आतापर्यंत केवळ सहा जणांना अटक झाली आहे. बाकीचे का मोकळे आहेत ते कळत नाही. या गुन्ह्यातील गुंतागुंत व त्यात कोण सामील आहे याचा उलगडा सीबीआय आपल्या तपासातून करेल, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना वाटत आहे. कारण हा हल्ला पोलिसांसमक्ष झाला तरी त्यांनी हस्तक्षेपास नकार दिला, असे वृत्त आहे.

प्रशासन अविश्वसनीय?

दंगली, हिंसाचार, महिलांवरील अत्याचार यांची चौकशी सीबीआयकडे सोपवणे आणि या संदर्भातील खटले मणिपूर बाहेर हलवण्याचा निर्णय केंद्राला घ्यावा लागला. याचा अर्थ राज्याच्या प्रशासनावर केंद्राचा विश्वास नाही. उलट ते परिस्थिती हाताळण्यात अपयशी ठरले आहे, याची ही अप्रत्यक्ष कबुली आहे. मणिपूरमधील पोलिसांसह संपूर्ण प्रशासन मैतेई व कुकी या दोन आदिवासी समूहांत विभागले गेल्याचे चित्र मधल्या काळात स्पष्ट झाले आहे. दोन महिलांवरील संतापजनक अत्याचाराचा तपास करण्यात पोलिसांनी शिथिलता दाखवली यावरून तेथील पोलिसांकडून या व अन्य गुन्ह्यांची निष्पक्षपाती चौकशी व तपास होण्याची शक्यता दिसत नाही. त्यामुळेच सीबीआयसारख्या सक्षम यंत्रणेकडे जबाबदारी दिली, तर ती पूर्वग्रह न बाळगता तपास करेल व तो तर्कसंगत शेवटास नेऊ शकेल. जर त्या राज्यात खटले चालवले गेले, तर न्याययंत्रणेवर कोणत्या तरी एका गटाकडून सतत दबाव येत राहील हेही उघड आहे. खटला चालवणार्या व्यक्तीही वांशिक हितसंबंधांपासून दूर राहतीलच याची खात्री देता येत नाही. त्यामुळे राज्याबाहेर खटले चालवण्याचा निर्णयही तर्कसंगत आहे. गुन्ह्यांचा तपास व न्यायालयीन प्रक्रिया याबाबत केंद्राने उचलेले पाऊल महत्त्वाचे आहे; पण मणिपूरमध्ये राजकीय पोकळी निर्माण झाली आहे, हेही केंद्र सरकारने मान्य केले पाहिजे. तीन मेपासून राज्यात सुरू असलेल्या हिंसाचारात दीडशेपेक्षा जास्त नागरिक मृत्युमुखी पडले, अनेक जखमी झाले, चर्चसह अनेक धार्मिक केंद्रे जाळण्यात आली, लहान बालके, महिला, वृद्ध यांच्यासह हजारो नागरिकांना छावण्यांत आश्रय घ्यावा लागला आहे. मुख्य मंत्री बिरेन सिंग हे सर्व पाहात राहिले आहेत. हताशपणे की त्यांना काही करण्याची इच्छा नाही की ते काही करू शकत नाहीत? केंद्र सरकारला याची माहिती नक्कीच असेल. बिरेन सिंग हेच राज्यातील समस्येचा मोठा भाग बनले आहेत हेही केंद्राने मान्य केले पाहिजे. दोन्हीकडे एकाच पक्षाची सत्ता आहे. गेल्या वर्षी गुजरातच्या निवडणुकीपूर्वी पक्षाने तेथील मुख्यमंत्र्यासह संपूर्ण मंत्रिमंडळ बदलले. मतदारांसमोर नवा चेहेरा देण्याचा तो प्रयत्न होता; पण मणिपूरमधील समस्या गंभीर आहे. तरीही पक्षाने मुख्यमंत्री बदलण्याचा निर्णय का घेतला नाही? त्याबद्दल पक्षाचे वरिष्ठ नेते मौन का बाळगून आहेत? हे प्रश्न देशास सतावत आहेत. गोळीबारात गेल्या आठवड्यांत मणिपूरमध्ये एकाचा बळी गेला आहे. जाळपोळ, मारहाणीच्या घटनाही घडत आहेत. वांशिक तणाव कायम आहे व तो आता मिझोराम व आसामपर्यंत पसरल्याचे दिसत आहे. तो शमवण्याऐवजी राज्यातील राजकीय नेतृत्व स्वस्थ आहे. त्यामुळेच केंद्राने घेतलेला किंवा घ्यावा लागलेला ताजा निर्णय योग्य म्हटला पाहिजे.

# पहिली शंभराची नोट

दादा कोंडके यांच्या बोटं लावीन तिथं गुदगुल्या चित्रपटातील पहिली शंभराची नोट माझ्या हातामध्ये दे हे गीत १९७८ सालात अत्यंत लोकप्रिय झालं होतं. तात्पर्य असे की त्यावेळेस शंभराच्या नोटेची मोठी पत होती .. अर्थातच किंमतही मोठी होती !! प्रत्येकाची शंभराची नोट बघण्याची इच्छा होत असे..!! लोक अशी नोट दिसली की त्याकडे कुतुहलानं पाहतच राहत.!! अर्थात शंभरची नोट जरी माणसाजवळ दिसली तर तो धनवान वाटत होता...

भारतीय अर्थव्यवस्थेत स्वातंत्र्यानंतर अनेक क्रांतिकारी परिवर्तने होत गेली. काही क्रांतिकारी परिवर्तनामुळे भारतीयांच्या प्रगती त्याचबरोबर आर्थिक विकासास चालना मिळाली; त्याचा ठसा जगभर उमटत गेला. पुढील काही परिवर्तनीय निर्णयामुळे देशाचा चेहरा मोहरा बदलत गेला; जसे की हरितक्रांती- बँकांचे राष्ट्रीयीकरण- राजीव गांधी यांचे संगणकीय धोरण; १९९२ सालापासून भारतातील व्यापारमुक्त व बंधन मुक्त धोरण.; आधार कार्ड योजना; मोदी सरकारची जनधन योजना; अशा अनेक सुविधा व योजना भारतीयांच्या प्रगतीस कारणीभूत ठरल्या! आर्थिक व चलनीय क्षेत्रात या निर्णयाची विशेष करून चर्चा होत राहिली. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी घेतलेल्या नोटबंदी निर्णयामुळे चलनात असलेल्या ५०० व हजार नोटा बाद करण्याचा निर्णय घेण्यात आला; चलनातून बाद झालेल्या नोटा बँकेतून बदलून घेण्यासाठी भारतीयांना बरेच कष्ट सोसावे लागले.

मागील दहा वर्षातील विकास दर व त्याचबरोबर रोकड-रकमेची साठेबाजी व उपलब्धी यामुळे ही नोटबंदी पचवणे अनेकांना जड गेले !! पण याच्या अगोदर सुद्धा भारतामध्ये नोटबंदी झाली होती याची कल्पना अनेक जणांना नाही. रुपये दहा हजार किमतीची जास्तीत जास्त नोट भारतीय चलनात अगोदर होती. ती नोटबंदी म्हणजे १६ जानेवारी १९७८ साली भारत सरकारने १हजार५ हजार व दहा हजाराच्या नोटावर बंदी घातली होती. बदलत चाललेली व्यापाराची माध्यमे- साधन व स्वरूप यामुळे चलनाची वाढती गरज. या अनुषंगाने बराच काळ एखादे चलन अर्थव्यवस्थेत ठेवल्यामुळे काळ्या पैशाचा सुळसुळाट होतो.. त्याचबरोबर नकली नोटा संबंधित व्यवहार व नकली नोटा छापण्याचे प्रकार वाढत जातात. नोटा जुन्या झाल्याने त्याचा वापर अंशत: होत नाही. अर्थातच चलनाची तरलता अर्थव्यवस्थेला हवीच असते; यामुळे नोटबंदी सारखे प्रयोग- त्याचबरोबर नवीन नोटा छपाई असे परिवर्तनीय बदल अर्थव्यवस्थेमध्ये सारासार पणे केले जातात. अर्थ विकासातील एक नियम असा आहे की देशातील चलनात कमी मूल्य नोटांची छपाई जास्त असते; त्याचबरोबर मोठ्या नोटा अत्यल्प प्रमाणात छापल्या जातात किंवा मोठ्या रकमेच्या नोटा चलनामध्ये मध्ये नसतात. याचे मुख्य कारण म्हणजे होणारे आर्थिक व्यवहार हे बँकेतून झाले म्हणजे अर्थव्यवस्था सक्षम होते!!

त्यामुळे विकसित देशांमध्ये रोख चलनाचे प्रमाण कमी प्रमाणात असते.. जसे की अमेरिकेमध्ये सद्यस्थितीमध्ये सगळ्यात मोठी नोट १०० डॉलरची आहे!! यामुळे अर्थव्यवस्था मजबूत होण्याचा प्रयत्न होतो व सरकारी यंत्रणेमार्फत किंवा घालून दिलेल्या नियमामार्फत व्यवहार झाल्याने निश्चितच सर्व माहिती सरकारकडे राहते व योग्य प्रकारे सरकारला करही मिळतो आणि देशाच्या प्रगतीस हातभार लावला जातो. कोरोना कालावधी पासून जणू काही वाईटातून बरे अशी परिस्थिती आर्थिक क्षेत्रात प्राप्त झाली आहे. ती म्हणजे डिजिटल बँकिंग द्वारे व्यवहाराचे वाढते प्रमाण !! या कालावधीत ऑनलाइन बँकिंग, डिजिटल बँकिंग ,इंटरनेट बँकिंग ह्या व्यवहारांची व्याप्ती वाढत गेली. अर्थातच रोख रकमेची गरज कमी होत राहिली. वित्तीय व्यवहार सहजासहजी या माध्यमाद्वारे होऊ लागले!! डिजिटल बँकिंग मध्ये इंटरनेट बँकिंग -मोबाईल बँकिंग- एटीएम -क्रेडिट कार्ड -यु पी आय अशा माध्यमाचा समावेश होतो.

**डॉ. डी. एस. काटे**
अर्थ तज्ज्ञ, (संभाजीनगर)
– ९४२२२ ०११४०

प्रत्यक्ष रोकड रकमेचा वापर न करता हे व्यवहार पार पडतात.. जगात सर्वात जास्त गतीने वाढणारी डिजिटल बँकिंग व्यवस्था म्हणजे भारत. येथून पुढे सर्व जगभरामध्ये सर्वच व्यवहार इंटरनेट बँकिंग द्वारे होण्याची शक्यता आहे.. चलनामध्ये प्रत्यक्ष रोकड रकमेचे महत्त्व यामुळे कमी होत राहील. केवळ साठेबाजी व भ्रष्टाचाराची रक्कम यासाठी रोख रकमेचा सर्रास वापर होत असल्याने .. आणी नोटा वितरण व छपाई खर्च दिवसेंदिवस वाढत चालला असल्याने नोटा छापण्याची भूमिका सरकार सहजासहजी मुक्तपणे स्वीकारत नाही.. आणि जास्त नोटा चलनामध्ये आणणे हेही अर्थव्यवस्थेत घातक आहे. आगामी काळामध्ये पाचशे-दोनशे या नोटां चलनातून बाद होऊ शकतात आणि फक्त भारतीय चलनामध्ये शंभर रुपयाची नोट हीच मोठ्या रकमेची असेल. असे वाटते!!

मग तर मित्रांनो पुढील नोटबंदी साठी आपण तयार राहूया! मग असे झाले तर परत एकदा... पहिली शंभराची नोट हातामध्ये दे! हे गाणे गुणगुणत राहू.

# धुमसते मणिपूर...

दहशतीच्या जोरावर आणि शस्त्रांचा धाक दाखवत महिलांना निर्वस्त्र करून त्यांची धिंड काढल्याची मणिपूरमधील(चरपळींी) घटना समाजमाध्यमांवर व्हायरल झाली आणि देशभर संतापाची लाट उसळली. घटना घडली दि. ४ मे रोजी, पण अडीच महिन्यांनी त्याचे व्हीडिओ व्हायरल झाले म्हणून मणिपूरमध्ये काय घडले ते देशाला समजले. मणिपूरच्या घटनांबद्दल देशभरात आक्रोश प्रकटल्यावर आरोपींना अटक झाली. आठशे-हजार जणांचा जमाव गावात घुसतो व घराघरांत घुसून हिंसेचे थैमान घालतो. जे पाच-सहा स्त्री-पुरुष आपला जीव वाचविण्यासाठी जंगलात पळून जातात, त्यांना जमावाकडून वेढले जाते, त्यातल्या दोन पुरुषांची हत्या केली जाते आणि महिलांना नग्न करून त्यांना मारहाण, अत्याचार करीत धिंड काढली जाते. एका तरुणीवर गँग रेप केला जातो. या एका व्हीडिओ क्लिपनंतर महिलांवरील अत्याचाराच्या आणखी काही घटनांचे व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. मुख्यमंत्री बीरेंद्र सिंग म्हणाले, 'एका एफआयआरवरून एवढा गोंधळ चालू आहे, पण असे शेकडो एफआयआर पोलिसांकडे नोंदवलेले आहेत'




मणिपूरच्या(चरपळींी) घटनेनंतर 'इंडिया' बॅनरखाली एकत्र आलेल्या काँग्रेसपासून डाव्या पक्षांपर्यंतच्या सर्व राजकीय पक्षांनी मोदी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचे कामकाज पहिल्या आठवड्यात बंद पाडले. सर्व कामकाज बाजूला ठेऊन मणिपूरवर चर्चा घडवावी व पंतप्रधांनीच उत्तर द्यावे, अशी हटवादी भूमिका विरोधकांनी घेतली. स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपला संताप व वेदना व्यक्त केल्या होत्याच, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मणिपूरच्या घटनांवर चर्चेची तयारीसुद्धा अगदी पहिल्या दिवसापासून दर्शवली होती. मणिपूरची घटना हा राजकीय प्रश्न नाही, तर तो सामाजिक आहे, हे ऐकून घेण्याच्या कोणी मन:स्थितीत नाही. मणिपूरमध्ये नग्नावस्थेत महिलांची काढण्यात आलेली धिंड व गँग रेप याचे राजकारण करण्याची विरोधी पक्षांत स्पर्धा लागलेली दिसून आली.

मणिपूरच्या(चरपळींी) व्हीडिओ क्लिप या अंगावर शहारे आणणाऱ्या आहेत. त्या बघताना चीड, संताप हे शब्द कमी पडावेत अशी प्रत्येकाची भावना होते. मणिपूरमधील अशांतता, असंतोष, हिंसाचार, रक्तपात आणि लैंगिक हिंसाचार यासंबंधी सोशल मीडियावर लेख, माहिती आणि व्हीडिओ याचा सध्या मारा चालू आहे. त्यात खरे किती, खोटे किती? हे समजण्याचा मार्ग नाही. पण राज्य व केंद्र सरकार विरोधात जनतेच्या भावना पेटविण्याचा जोरदार प्रयत्न चालू आहे. केंद्रात आणि राज्यात दोन्हीकडे भाजपचे सरकार आहे. म्हणूनच काँग्रेस, तृणमूल काँग्रेस व डावे पक्ष मोदी-शहा आणि बिरेंद्र सिंग यांच्याविरोधात रोज थयथयाट करताना दिसत आहेत.

१९७५-७६ मध्ये आणीबाणीच्या कालखंडात इंदिरा गांधी सरकार विरोधात देशभर असंतोष खदखदत होता. १९८४ मध्ये दिल्लीमध्ये झालेले शीख हत्याकांड, बाबरी मशीद उद्ध्वस्त झाल्याच्या घटनेनंतर १९९२-९३ मध्ये मुंबईत झालेल्या दंगली व हजार लोकांची झालेली हत्या, २००२ मध्ये गोध्रा हत्याकांडानंतर गुजरातमध्ये झालेल्या दंगली व हजार लोकांचे झालेले शिरकाण अशा घटनांनी देश हादरला होता. पश्चिम बंगालमध्ये या वर्षी झालेल्या पंचायतीच्या निवडणुकीत झालेला हिंसाचार व रक्तपात हा सुद्धा महाभयंकर होता. ईशान्य भारतातील राज्ये संवेदनशील आहेत. आसाम काहीसा शांत आहे पण मणिपूर, मिझोराम व नागालँड ही राज्ये तर ज्वालामुखीच्या तोंडावर उभी आहेत. एकीकडे म्यानमार व दुसरीकडे चीन. एकाकडून बेकायदा घुसखोरी व दुसरीकडून आक्रमणाची भीती. गेल्या दोन-तीन दशकांत धर्मांतराने येथील समस्या संवेदनशील झाली आहे. एनआरसी म्हणजेच नॅशनल रजिस्ट्रार ऑफ सिटीझन्समुळे घुसखोरीला चाप बसेल, असे वाटले होते. पण त्यावर प्रतिक्रियाही तीव्र उमटल्या. अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम, नागालँड, मणिपूर या राज्यांत ख्रिश्चन लोकसंख्या लक्षणीय आहे. मणिपूरवर वर्षानुवर्षे काँग्रेसची सत्ता होती. आता मात्र भाजप सरकारच्या काळात तेथे सातत्याने भडका उडत आहे. मणिपूरमध्ये मैतेई विरुद्ध कुकी अशा संघर्षाला धार आली आहे. मैतेईंची लोकसंख्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. पण डोंगराळ व टेकड्यांवर राहणाऱ्या कुकींची संख्या काहीशी कमी, पण त्यांना जातीच्या सवलती जास्त आहेत. मैतेई हे मूळचे आदिवासी, त्यात दलित ओबीसी कसे, जाती वर्णव्यवस्था कशी, मैतेईमध्ये मुस्लीम कसे, असे प्रश्न गुंतागुंतीचे आहेत. कुकी समाज बहुसंख्य ख्रिश्चन आहे. त्यांना जे अधिकार आहेत, ते मैतेई समाजाला नाहीत हे खरे दुखणे आहे. देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी मणिपूर हे स्वतंत्र संस्थान होते. १५ ऑक्टोबर १९४९ मध्ये ते भारतात विलिन झाले. १९५६ पर्यंत मणिपूर केंद्रशासित होते. १९७२ मध्ये मणिपूरला स्वतंत्र राज्य म्हणून मान्यता देण्यात आली. १९८१ मध्ये मणिपूरमध्ये मैतेई व कुकी यांच्यात झालेल्या मोठ्या हिंसाचारात एक हजारांवर मारले गेले होते. तेव्हा केंद्रात इंदिरा गांधींचे सरकार होते. झालेल्या करारानंतर मैतेई हे पठारावर-मैदानावर आणि कुकी समाज टेकड्यांवर एकवटला. मणिपूरच्या उंच टेकड्यांवर अफूची शेती मोठी आहे. कुकींचे ते उत्पन्नाचे फार मोठे साधन आहे. गावाच्या सीमा आणि मालकी हक्कावरून मैतेई, कुकी व नागा यांच्यात वारंवार संघर्ष चालूच असतो.


गेल्या तीन महिन्यांतील हिंसाचारात मणिपूरमध्ये ७ हजार गुन्हे नोंदवले गेले आहेत. स्वत: मुख्यमंत्री बिरेंद्र सिंग यांनी ४ मेच्या घटनेचा व्हीडिओ बघितला आणि दोषींना मृत्यूदंडाची शिक्षा व्हावी यासाठी सरकार प्रयत्न करील, असे म्हटले. मणिपूरची लोकसंख्या ४० लाख आहे. त्यात ५३ टक्के मैतेई व ४० टक्के कुकी व नागा आहेत. मैतेई प्रामुख्याने इम्फाळ खोऱ्यात राहतात. नागा-कुकी टेकड्यांवर राहतात. मणिपूरमध्ये १६ जिल्हे आहेत. तेंगनुपाल, चुराचांदपूर, इम्फाळ इस्ट, इम्फाळ वेस्ट, विष्णुपूर हे जिल्हे हिंसाचाराने जास्त प्रभावित आहेत. मैतेई गटात मैतेई लिपुन, अरम्बाई टेंगोला, पीपल्स लिबरेशन आर्मी, को-ऑर्डिनेटिंग कमिटी ऑन मणिपूर इंटीग्रिटी या संघटना आहेत. तसेच कुकी गटात कुकी नॅशन आर्मी, कुकी रेव्होल्युशनरी आर्मी, जोमी रेव्होल्युशनरी आर्मी, कुकी स्टुटंड ऑर्गनायझेशन अशा संघटना आहेत. आम्ही आदिवासी होतो, आम्हाला अनुसूचित जमातीचा दर्जा मिळालाच पाहिजे, यासाठी मैतेईंचा संघर्ष चालू आहे.

मणिपूर हा अफू विकणाऱ्या गोल्डन ट्रँगलचा भाग आहे. विवस्त्र महिलांची धिंड काढल्याच्या व्हीडिओ क्लिप्स जशा व्हायरल झाल्या तसेच सशस्त्र दलाच्या पथकांवर महिला हल्ला करतानाच्या क्लिपही व्हायरल झाल्या आहेत. मणिपूरच्या विधानसभेत भाजपचे दहा आमदार आहेत. राज्यातील कुकींच्या प्रभावाखाली असलेल्या क्षेत्रासाठी स्वतंत्र प्रशासन निर्माण करावे, अशी काहींनी मुख्यमंत्री ए. बिरेंद्र सिंग यांच्याकडे मागणी केली आहे. मैतेई समुदायाचे हजारपेक्षा जास्त लोक मिझोराम सोडून मणिपूरला आले आहेत. मणिपूरमध्ये अगोदरच निर्वासित छावण्यांमध्ये साठ हजारांपेक्षा जास्त लोकांनी आसरा घेतला आहे. तीन मेपासून मणिपुरात हिंसाचाराचे थैमान सुरू झाले व विवस्त्र महिलांची धिंड काढल्याची घटना ४ मे रोजी घडली. या घटनेचे व्हीडिओ १९ जुलैला व्हायरल झाले. स्वत: पंतप्रधानांनी या घटनेबद्दल संपात प्रकट केला, आपल्याला अतिव वेदना झाल्याचे सांगून जे दोषी आहेत, त्यांना कठोर शासन केले होईल, असे आश्वासन देशाला दिले. चुराचांदपूर येथे काळे कपडे परिधान करून हजारो महिलांनी मोर्चा काढला व आपला तीव्र संताप प्रकट केला.

मणिपूर हे देशाच्या सरहद्दीवरील संवेदनशील राज्य आहे. हत्या, हल्ले आणि विवस्त्र महिलांची धिंड याचे सर्व खापर मुख्यमंत्र्यांवर फोडले जात आहे. मुख्यमंत्रीही राज्यातील जनतेला दिलासा देण्यात कमी पडले, असे देशाला दिसले. घटनेची वाच्यता ७७ दिवसांनी झाली, हे तर अतिशय गंभीर आहे. एफआयआर नोंदवल्यानंतरही पोलीस ढिम्म राहिले याची सर्वत्र चीड आहे. व्हीडिओ व्हायरल झाला नसता, तर देशाला मणिपूरमध्ये काय झाले हे कळलेच नसते. पण संसदेच्या अधिवेशनाच्या पूर्व संध्येलाच व्हीडिओ व्हायरल होतो, हे संशयास्पद आहे. मणिपूरची घटना हे मोदी सरकारच्या विरोधात आपल्याला जणू मोठे शस्त्र मिळाले आहे, अशा आविर्वाभात विरोधी पक्ष वागत आहे. मणिपूरमधील हिंसाचारात दोनशे जण ठार झाले असतील, तर त्याला जाबाबदार कोण? काँग्रेस केंद्रात सत्तेवर असताना अनेक बडे नेते इशान्येकडील राज्यांतून राज्यसभेवर खासदार म्हणून आले होते. पण काँग्रेसने इशान्येकडील राज्यांच्या दुखण्यावर मलमपट्टी करण्याखेरीज काही केले नाही. कारगील युद्धात लढलेला भारतीय सैनिक मणिपूरमधील हिंसाचारात त्याच्या पत्नीला वाचवू शकला नाही. मणिपूर हा राजकारणाचा विषय नाही, समाजा-समाजांतील वैमनस्य आणि घुसखोरी याला लगाम घालण्याची गरज आहे.

**-स्टेटलाइनः डॉ. सुकृत खांडेकर**

## शब्दकोडे-१३६



आडवे शब्द - १. मनमोहन सिंग हे पद सध्या दुसऱ्यांदा भूषवत आहेत ४. तडीपार ६. पदार्थ ९. कंटाळवाणे भाषण १०. वेदनाशामक, पित्तशामक औषधी कंद ११. आयुष्य, पाणी १३. तात्काळ, योग्य उत्तर देणारा १५. शुभ्र १७. मूर्त रूप देणे १८. ताकद १९. काम, कार्य २१. सापाची एक जात २३. निवड न करता २४. जास्तीतजास्त व कमीतकमी २६. ताप जाण्यासाठी असा घाम येणे आवश्यक २७. प्रतिष्ठा २८. आहे त्यात निभावण्याची आज्ञा! ३०. करुणा, कीव ३२. मधुमक्षिका ३५. नऊ भावनांचा समुच्चय ३६. रावण ३७. उडालेला थेंब ३८. माल साठविण्याची जागा ३९. जे सूर्यालाही दिसत नाही ते म्हणे या मंडळींना दिसते! ४०. मांडी, आकडा ४१. गोल गरगरीत ४३. कोवळा अंकुर ४५. हंगाम, पाळी ४६. गणपतीचे एक नाव ४८. सोंगाड्या ४९. गेरू ५०. स्वच्छ, निर्भेळ ५१. रसाळ ५४. सरपटणारा आणि चिवट पकड असणारा प्राणी ५६. निर्लज्ज, निगरगट्ट ५७. तथाकथित काळी जादू ५८. मेथीची चव ६०. उत्तर दिशा, सवय, राबता ६१. कृती न करता बघणारे, प्रेक्षक ६२. चोरी करणारा ६३. सोपे (हिंदी) ६५. दारावरील खुणेचा आवाज ६७. धातूची तार काढणारा ६८. शर्करा ६९. मऊ, नरम च्या विरुद्ध

उभे शब्द - १. जुन्या काळचे शिक्षकांचे संबोधन २. मुख्य कचेरी (हिंदी) ३. मऊ होणे ४. दु:खी होणे ५. खुंट, मेख ६. गोल गोल गोड पदार्थ ७. सगळ्या धर्मातील लोकांना सारखी वागणूक देण्याचे तत्त्व ८. ज्ञान, उकल १०. दुर्लक्ष झाल्यामुळे होणारे हाल १२. व्रत १४. प्रचंड १९. हात २०. मध २१. अंत:करण २२. दात २३. चोघड्याबरोबरचे मांगल वाद्य २५. लेखक, वक्तेफ यांना मिळणारी सन्मानाची रक्कम २६अ. सुखावणारा वास २७. सुरुवातीलाच अडथळा येणे या अर्थी वाक्प्रचार २९. उष्ण ३१. स्वकीयांची लढाई ३२. आर्जव, खुशामत ३३. लाकडी चपला ३४. निमगोरा ३५. खून करणे, मारून रक्त पिणे ४०. नामनिराळे होणे ४२. अणकुचीदार ४४. फुरसत ४७. बाण ४९. कपडालत्ता ५०. दिवेलागणीचा श्लोक- '--- कल्याणम् आरोग्यम् धनसंपदा' ५२. आरास, देखावा ५३. वाळवंट ५५. फुरसत ५९. खिल्ली, चेष्टा ६०. कसदार ६४. वेल ६५. एकाग्र दृष्टी ६६. कशा प्रकारचा बटवा?

### शब्दकोडे १३५ चे उत्तर

आडवे उत्तर - १.जवाहरलाल नेहरू इंदिरा गांधी १०.लाट ११.माल १२.रयत १४.वणीक १६.नरमी १८.लवाजमा २१.पास २३.समता २४.प्रयास २६.रण २७.ललना २८.गो २९.वर ३०.महान ३१.अज ३२.पर्व ३३.पातळ ३४.बासन ३५.चावळचावळ ३८.वात ३९.कळ ४०.सल ४२.नीळ ४३.जवळपास ४५.रहाटगाडगे ४८.वर्षाव ४९.रमजान ५०.हडळ ५२.समरसता ५५.हाकाटी ५८.सलग ६०.कासरा ६२.कोलम ६४.टाप ६६.ताजमहाल ६८.अटकळ ७०.तसनस ७१.कळप ७२.रटरट ७४.डीर ७६.सरणे ७७.कसरत ७८.कडीकोयंडा

उभे उत्तर - १.जलावतरण २.वाटणी ३.रमा ४.लालनपालन ५.नेहमी ६.रुमाल ७.राजमाता ८.धीर ९.अंत १३.यच्चयावत १५.कट्टी १७.रसना १९.वासरू २०.जम २२.जळजळ २५.सरळ २७.लहानसहान ३०.मस ३१.अवघड ३२.पळ ३३.पातळसर ३४.बाळ ३६.चानी ३७.वळवळ ३८.वाव ३९.कमरकस ४१.लट ४३.जवस ४४.सरिता ४५.रजाचा गज करणे ४६.गायिका ४७.गेह ५१.डवरा ५३.मळमळ ५४.सन्नाटा ५५.हातोहात ५६.टीका ५७.चकोट ५९.लता ६१.सडसडीत ६३.लकवा ६५.परोपकार ६७.लसलस ६९.गोरस ७१.कपडा ७३.टर ७५.सँडी

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी अडकला लॅन्डसीडिंगमध्ये

## शेतकऱ्यांना तात्काळ न्याय देण्याची स्वराज्य पक्षातर्फे मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेतील लॅन्डसीडिंग बाबतची अडचण सोडवून अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी स्वराज्य संघटनेतर्फे नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने पूर्व विभाग जिल्हाप्रमुख प्रा. उमेश शिंदे यांनी नाशिकचे जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

स्वराज्य संघटनेतर्फे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, २७ जुलै २०२३ रोजी जमा झालेला हप्ता व त्या आधीचे काही हप्ते मिळण्यापासून शहरी भागातील आडगाव सह शहरी भागातील शेतकऱ्यांना वंचित ठेवले गेले असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाने देखील पीएम किसान सन्मान निधी योजनेत मिळणारी लाभाइतकीच रक्कम राज्यसरकार थेट बँक खात्या द्वारे मिळणार आहे अशी



घोषणा केली. परंतु केंद्राच्या पीएम किसान निधीचा लाभ सुरवातीला बऱ्याच शेतकऱ्यांना काही हप्ते मिळालेत. परंतु काहीं हप्तेपासून सर्व आवश्यक बाबींची पूर्तता करून ही लॅन्डसीडिंग असा मेसेज येत असून सदर बाबतीत काय प्रक्रिया आहे? ती कशी पूर्ण करायची? कोण करणार? याचा खुलासा आपल्या मार्फत व्हावा. अशा परिस्थितीत शेतकरी गोंधळात पडले असून नेमकं कारण समजत नाही. दप्तर दिरंगाईमुळे हजारोंच्या संख्येने शेतकऱ्यांना वंचित ठेवले जात असेल तर सदर योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळण्यासाठी तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी आपण जबाबदार संबंधित यंत्रणेला आदेश द्यावा अशी मागणी करण्यात आली.

यासाठी तांत्रिक अडचण दूर करण्यासाठी शासन आपल्या दारी या अभियानाद्वारे आडगाव व नाशिक जिल्हयातील हजारो शेतकऱ्यांना नाय देण्यासाठी स्वराज्य संघटना व शासकीय अधिकारी, कर्मचारी मिळून एकत्रित उपक्रम राबविला पाहिजे, यातून वंचित शेतकऱ्यांना न्याय मिळेल. आम्ही लवकरच शेतकऱ्यांची बैठक आयोजित करणार आहे त्यात आपले जबाबदार अधिकारी, कर्मचारी यांनी लॅन्डसीडिंग बाबत मार्गदर्शन किंवा तांत्रिक दोष दूर करण्यासाठी आडगाव या ठिकाणी कार्यशाळा घेऊन योग्य ते मार्गदर्शन करून सहकार्य करावे. अशी विनंती जिल्हाप्रमुख उमेश शिंदे यांनी केली आहे. अन्यथा स्वराज्य पक्ष राज्य संपर्क प्रमुख यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करेल व पुढच्या परिणामास आपण जबाबदार असाल असा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी निवेदन देण्यासाठी स्वराज्य पक्ष राज्य संपर्क प्रमुख करण गायकर, उत्तर महाराष्ट्र प्रमुख केशव गोसावी, राज्य कार्यकारणी सदस्य किरण डोखे, पूर्व विभाग जिल्हाप्रमुख प्रा.उमेश शिंदे, जिल्हाप्रमुख आशिष हिरे, ग्रामीण जिल्हाप्रमुख डॉ.रुपेश नाठे, वकील आघाडी उत्तर महाराष्ट्र प्रमुख ड नवनाथ कांडेकर, कामगार आघाडी जिल्हाप्रमुख दिनेश नरवडे, ज्ञानेश्वर कोतकर, सुदर्शन हिरे, शेतकरी संजय देशमुख,ड. बाळासाहेब शिंदे, सुमित कडवे, संतोष रोकडे आदी उपस्थित होते.

## विश्व हिंदू परिषदेच्या नाशिक जिल्हा उपाध्यक्षपदी संतोष केंदळे



**लासलगाव ।** विश्व हिंदू परिषदेच्या नाशिक जिल्हा उपाध्यक्षपदी लासलगाव येथील गोरक्षक संतोष केंदळे यांची निवड करण्यात आली.श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज सभागृह येथे झालेल्या जिल्हा बैठकीत नाशिक जिल्हा मंत्री देविदास वारुंगसे महाराज यांनी संतोष केंदळे यांची निवड केली.

लासलगाव रेल्वे स्टेशन येथील रहिवासी असलेले संतोष केंदळे प्रसिद्ध गोरक्षक म्हणून ओळखले जातात. लासलगाव परिसरात बेवारस भटकत असलेल्या गोवंशिय जनावरांची निस्वार्थपने सेवा करण्याचा निर्धारच त्यांनी व त्यांच्या सहकारी गोरक्षकांनी केला आहे.त्यांच्या या कार्याची दखल घेऊन देविदास वारुंगसे महाराज यांनी संतोष केंदळे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड केली आहे.

विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून हिंदू समाजाला संघटित करून त्यांना एकत्रित करण्यासाठी तसेच हिंदु धर्माची सेवा आणि संरक्षण करण्यासाठी,गोहत्या थांबविण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे संतोष केंदळे यांनी या वेळी सांगितले.संतोष केंदळे यांची निवड झाल्याबद्दल बजरंग दल,विश्व हिंदू परिषद,बाबा अमरनाथ ग्रुप तसेच सकल हिंदू समाजाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

## जाहिर नोटीस

ॲड.टी. एस. अमृतसागर
निशाणी नं.६

**धुळे येथील मे. ज्युडि. मॅजि. सो. वर्ग १ धुळे यांचे कोर्टात**

फौ. कि. अर्ज नं.६३१/२०२३

दिपाली बापु मासुळे उ.व. :२० वर्ष, कामधंदा :- घरकाम
रा.:-सुट्रेपाडा/आनंदखेडे, ता. जि. धुळे
ह.मु.चौगाव, ता. जि. धुळे. ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

म. निबंधक सो.,
जन्म व मृत्यु नोंदणी विभाग
गृप ग्रामपंचायत आनंदखेडे, ता. जि. धुळे. ....**सामनेवाला**

(दिपाली बापु मासुळे हीचा जन्म दि. ०८/०१/२००३)

ज्याआर्थी अर्जदाराने धुळे येथील मे. ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. धुळे दि. २१/०७/२०२३ रोजी फौ. कि. अर्ज. नं. ६३१/ २०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे दिपाली बापु मासुळे हीच्या जन्माची नोंद करणेबाबत धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि. ०४/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. न्यायदडांधिकारी सो. प्रथम वर्ग कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :-धुळे
दिनांक-३१/०७/२०२३

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**
**सहा. अधिक्षक** — **मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

# डिस्टील एजुकेशन आणि टेक्नोलॉजी प्रायव्हेट लिमिटेडचा राज्य सरकारशी करार



## डिस्टील एजुकेशनचे विनेश मोरे यांची माहिती

**नाशिक । प्रतिनिधी**

डिस्टील एजुकेशन आणि टेक्नोलॉजी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचा राज्य सरकार विभागाशी करार झाल्याची माहिती डिस्टील एजुकेशनचे नाशिक विभागाचे संचालक विनेश मोरे यांनी दिली आहे.

राज्यात रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने महत्त्वपूर्ण वाटचाल करताना येथील डिस्टील एजुकेशन आणि टेक्नोलॉजी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीया रोजगार व कौशल्य विकास कंपनीने राज्य सरकारच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोपक्रम विभागासोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. अवघ्या एका वर्षात (सन २०२३ ते २०२४) तब्बल दहा हजार व्यक्तींसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, मंगल प्रभात लोढा यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आल्याची माहिती कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अर्जुन मिश्रा यांनी दिली. यावेळी आयुक्त डॉ. रामास्वामी एन, रोजगार अधिकारी सचिन ढेरे, अर्जुन मिश्रा, नाशिक विभागाचे रिजिनल व्यवस्थापक विनेश मोरे आदींसह उद्योजक, कंपन्यांचे मालक, चालक व व्यवस्थापनातील अधिकारी व कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अर्जुन मिश्रा यांनी यावेळी सांगितले की, डिस्टील एजुकेशन ही कंपनी देशभरात रोजगार, औद्योगिक प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योजकता प्रशिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आघाडीवर आहे. या कंपनीला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अनेक गौरव पुरस्कार मिळाले आहेत. अर्जुन मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली डिस्टील एजुकेशन या कंपनीने राज्य सरकारच्या रोजगार विभागाशी सामंजस्य करार केल्याने डॉ. रामास्वामी यांच्या हस्ते अर्जुन मिश्रा यांचा सन्मान करण्यात आला.

# छोट्या निखिलच्या अकाली निधनाने गहिवरल्या आ. हिरे

**अंबड । प्रतिनिधी**

एकाकी आलेला काळाचा घाला आणि त्यामध्ये निघून गेलेला निखिल यामुळे सैंदाणे परिवार व अंबड परिसरावर दुःखाची गडद छाया पसरलेली आहे. दि. २७ जुलै रोजी आशीर्वादनगर म्हाडाकॉलनी, अंबड, नाशिक येथील निंबा मधुकर सैंदाणे व दिपाली निंबा सैंदाणे यांचा इयत्ता चौथी या वर्गात शिकणारा निखिल घरामध्ये झोका खेळत असताना अचानक झोक्याची दोरी गळ्याच्या भोवती आवळल्यामुळे निखिलचे दुर्दैवी निधन झाले. या घटनेमुळे संपूर्ण परिसरावर दुःखाची कळा पसरलेली आहे.

नाशिक पश्चिम विधानसभा मतदार संघाच्या आमदार सीमा हिरे यांनी सैंदाणे परिवाराची भेट घेतली. निखिलच्या आई-वडिलांवर या घटनेमुळे मोठा आघात झालेला आहे. लहान मुलांच्या घडत असलेल्या अपघाती घटना या दुर्दैवी असून दुःखदायी देखील आहेत. यामुळे कुटुंबावर फार मोठा आघात होतो आणि हे दुःख नेहमीच कुटुंबीयांच्या काळजात घर करून बसत असते.

अशा परिस्थितीत कुटुंबीयांनी एकमेकाला सावरले पाहिजे. लहान मुलांना जपले पाहिजे. आई-वडिलांकडून एखादं काम कमी झालं तरी चालेल. परंतु मुलांवर मात्र कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे आणि दुर्दैवी घटना टाळल्या पाहिजेत. याकरता खबरदारी घ्यावी असे सांत्वनपर आवाहन आ. सीमा हिरे यांनी यावेळी करत सैंदाणे कुटुंबीयांचे सांत्वन करण्यात आले. यावेळी पीडित कुटुंबीयांना पंतप्रधान विद्यार्थी अपघात विमा योजनेची माहिती देण्यात आली.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. जि. धुळे पैकी मौजे धुळे ता. जि. धुळे शिवारातील धुळे मनपा हद्दीतील भुमापन क्र. ७५५८ पैकी प्लॉट नं. २४ चे एकूण क्षेत्र २७० चौ. मी. चा बखळ प्लॉट अशी मिळकत श्री. पंडित रामचंद्र सोनार, रा. देवपुर, धुळे, ता. जि. धुळे यांचे मालकीची व ताबे उपभोगाची आहे.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत आमचे अशिल श्री. जिवन विजय छलवाणी रा. सुभाष नगर जुने धुळे ता. जि. धुळे यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदा श्री. पंडित रामचंद्र सोनार यांचेशी सौदा पावती केलेली असुन तसेच लवकरच नोंदणीकृत व्यवहार करणार आहेत.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचा गहाण, सौदा, खरेदी, विक्री, कर्ज, तथा संच बोझा आदी कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर १० दिवसांच्या आत सदर हरकत, हक्क, अधिकार अथवा हितसंबंधा बाबतचा लेखी पुरावा आमच्याकडे खालील पत्यावर स्वतः समक्ष येवून, आणुन देवुन त्याची खात्री पटवून दयावी. अन्यथा सदर मिळकत ही निर्बोज, निर्वेध्य आहे असे समजुन सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसे न केल्यास त्यानंतर सदर बाबतीत कोणतीही हरकत आमचे अशिल यांच्यावर बंधणकारक राहणार नाही व खरेदीचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस आमचे अशिलाचे सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे,

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे
दिनांक :- ३१/०७/२०२३

(शिक्का) **ॲड. प्रियंका अनंत विभांडीक**

# निपमच्या राष्ट्रीय निवडणूक अधिकारीपदी नाशिकचे ॲड.श्रीधर व्यवहारे

**नाशिक । प्रतिनिधी**



नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ परसोनेल मॅनेजमेंट (निपम) च्या २०२३-२५ या द्वैवार्षिक निवडणुका राष्ट्रीय पातळीवर होत आहेत. या निवडणुकीचे निवडणूक अधिकारी म्हणून नाशिकचे ड. श्रीधर व्यवहारे यांची नेमणूक करण्यात आली आहे. निपम ही भारतातील सर्वात जुनी आणि सर्वात मोठी संस्था एचआर मध्ये काम करते.

भारतात एकंदरीत ५३ शाखा असून दर दोन वर्षांनी निवडणुका होतात. निपमचे मुख्य ऑफिस कोलकाता येथे आहे. नुकतीच राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक चेन्नई येथे संपन्न झाली. त्या ठिकाणी नाशिकचे राष्ट्रीय विशेष निमंत्रित ॲड. श्रीधर व्यवहारे यांची राष्ट्रीय निवडणूक अधिकारी या पदावर नेमणूक करण्यात करण्यात आल्याने यानिमित्ताने नाशिकला प्रथमच संधी प्राप्त झाली असून नाशिकला सन्मान प्राप्त झाला आहे.

कोची-केरळ येथील राष्ट्रीय मुख्य निवडणूक अधिकारी पी. प्रेमचंद आणि दिल्ली येथील संजय वाधवानी (ओएनजीसी चे माजी कार्यकारी संचालक) आणि नाशिकचे ॲड. श्रीधर व्यवहारे अशी त्री-सदस्य निवडणूक समिती स्थापन झाली आहे. नवीन राष्ट्रीय कार्यकारिणीचा कालावधी २०२३ ते २०२५ असेल. असे ॲड. व्यवहारे यांनी सांगितले. ॲड. व्यवहारे हे गेल्या वीस ते पंचवीस वर्षापासून राष्ट्रीय कार्यकारणीवर विविध पदांवर कार्यरत आहेत. त्यांना राष्ट्रीय लाईफ टाईम फेलोशिप अवॉर्ड सुद्धा मिळालेला आहे. त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात विविध कॉन्फरन्सेस आणि सेमिनारमध्ये सहभाग करण्याची संधी प्राप्त झाली आहे. औद्योगिक क्षेत्रातील पब्लिक सेक्टर आणि प्रायव्हेट सेक्टर मधील ह्यूमन रिसोर्सेस मॅनेजर्स, कामगार कायदा, परसोनेल मॅनेजमेंट या क्षेत्रातील विविध प्रोफेशनल सदस्य आहेत. निपम ही संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करते.

एडवोकेट श्रीधर व्यवहारे हे सध्या निमा नाशिकचे विश्वस्त आणि कार्यकारी समिती सदस्य आहेत. त्यांच्या या निवडीचे स्वागत व अभिनंदन नाशिक निपम शाखेचे अध्यक्ष प्रकाश बारी, सरचिटणीस हेमंत राख, उपाध्यक्ष राजाराम कासार व राहुल बोरसे, खजिनदार विनायक पाटील, सहसचिव प्रकाश गुंजाळ, कार्यकारणी सदस्य राजेंद्र आचारी, तुषार मोमीन, सुस्मित दळवी, मनोज मुळे, रमेश गवळी, उदय खरोटे, श्रावण खैरनार, विश्वनाथ डांगरे, पोपटराव सावंत, सुधीर पाटील, दिलीप महाले, शरद बरहाटे, घुले आदींनी केले आहे.

## जाहिर नोटीस

**प्रोसेस जमा**

ॲड.अनिल जी जगताप/
ॲड. दिपराज एम. पाटील
निशाणी नं.६

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर सो. यांचे कोर्टात**

दि.कि.अ.नं. २१६/२०२३

१) श्री. संजय वसंत सोमवंशी, वगैरे- ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

**कुणीही नाही**

( कै. पुनम संजय सोमवंशी) ....**जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दि. २०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. पुनम संजय सोमवंशी यांचे निधन दि. १६/०७/२०१८ रोजी मौजे कासारे, ता. साक्री जि. धुळे येथे झाले आहे. तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

वारसांची नावे — नाते / संबंध
१) श्री. संजय वसंत सोमवंशी- पती
२) वैभवी संजय सोमवंशी- मुलगी
३) दिया संजय सोमवंशी - मुलगी
४) भिकुबाई प्रकाश भावसार - आई

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात दि. ३०/०८/ २०२३ रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहिशिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ :- साक्री
दिनांक :- २१/०७/२०२३

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायालय, साक्री**
**सहा. अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय, साक्री**

## जाहिर नोटीस

**प्रोसेस जमा**

ॲड.अनिल जी जगताप
निशाणी नं.६

**साक्री येथील मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर सो. यांचे न्यायालयात**

दिवाणी कि. अर्ज क्र. २१३/२०२३

श्री. माधवराव आसाराम पाटील वै. उ.व. ४५, धंदा व्यवसाय
रा. मुकंद नगर प्लॉट नं. ५१/ब साक्री ता.साक्री जि.धुळे
....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

**कोणीही नाही** ....**जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दिनांक / /२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. यशोदाबाई आसाराम पाटील यांचे दिनांक ०२/०६/२०२३ रोजी निधन झाले आहे मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१) श्री. माधवराव आसाराम पाटील
२) श्री. प्रकाश आसाराम पाटील
३) श्री. भानुदास आसाराम पाटील
४) श्री. भास्कर आसाराम पाटील

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्या अर्थी या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात दिनांक ३१/०८/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलामार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात यईल.

सदर जाहिर नोटीस नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीत दिली असे.

स्थळ :- साक्री
दिनांक :- २१/०७/२०२३

(शिक्का)

**कामगिरी लिपीक** — **दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री**
**सहा. अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री**

## जाहिर नोटीस

**प्रोसेस जमा**

ॲड. जगदिश बी. पगारे, धुळे
निशाणी नं.६

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. व.स्तर यांचे कोर्टात**

दि.कि. अर्ज नं. ६९/२०२३

विनायक अशोक काकडे, वगैरे ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

**कोणीही नाही** ... **जाबदेणार**

१) कै. वनाबाई हरी काकडे (मयत)
मृत्यु दि. ०९/०७/१९९८ रोजी सुभाष नगर, गल्ली नं. १, जुने धुळे येथे मयत
२) कै. अशोक हरी काकडे
मृत्यु दि. ०८/१२/१९१८ रोजी सुभाष नगर, गल्ली नं. १, जुने धुळे येथे मयत ....**मयत**

ज्याअर्थी दि. ११/०१/२०२३ रोजी सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार यांनी मयत कै. वनाबाई हरी काकडे व मयत कै. अशोक हरी काकडे यांचे कायदेशीर वारस आहेत. यासंदर्भात वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) मिळावा म्हणून सदरचा अर्ज धुळे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता चौकशी तारीख २९/०८/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारसांना व इतर संबंधितांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, याबाबत कोणास काही वाद, हरकत असल्याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क्रमांक यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित न झाल्यास सदरकामी कोणाचीही, काहीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. न्यायालयाच्या सही-शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : २७/०७/ २०२३

(शिक्का)

**कनिष्ठ लिपीक** — **दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे**
**अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे**

## न्यूज कॉलम

### दगडफेकप्रकरणी २८ जणांना पोलीस कोठडी

**नाशिक ।** मणिपूर येथील घटनेच्या निषेधार्थ काल दि. २९ वंचित आघाडी, आदिवासी एकता परिषद व महाविकास आघाडीने शहरातून काढलेल्या मोर्चाच्या समारोपानंतर काही समाजकंटकांनी केलेली तोडफोड व हिंसक घटनांच्या प्रकरणी पोलिसांनी अटक केलेल्या ३१ जणांपैकी २८ जणांना सटाणा न्यायालयासमोर उभे केले असता त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे, तर तीन अल्पवयीन संशयितांना सध्या त्यांच्या पालकांच्या सुपूर्त करण्यात आले असून कायदेशीर प्रक्रियेनंतर त्यांना बाल न्यायमंडळ नाशिक यांच्या ताब्यात देण्यात येणार आहे.

### आर. सी. पटेल महाविद्यालयात वृक्षारोपण

**शिरपूर ।** आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयात माजी सैन्य अधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करत 'कारगिल विजय दिवस' साजरा करण्यात आला. विद्यार्थी व शिक्षक यांनी २६ जुलै २०२३ रोजी 'कारगिल विजय दिवस' साजरा करण्यासाठी वृक्ष लागवडीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासाठी शहरातील ३० सेवानिवृत्त लष्करी अधिकारी यांना आमंत्रित करून वीर शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करत १०० हून अधिक वृक्ष लागवडीचा अभिनव उपक्रम हाती घेतला. २६ जुलै रोजी कारगिल युद्धात भारताने पाकिस्तान च्या सैन्याला भारतीय सीमेतून हाकलून लावत आपल्या विजयाचा ध्वज कारगिल येथे फडकावला होता. भारतीय सैन्याच्या या शौर्याच्या स्मृती साजरी करण्यासाठी हा दिवस 'कारगिल विजय दिवस' म्हणून साजर केला जातो.

# मोदी साहेबांनी तळागाळातील जनसामान्यांचा विचार करून वेगवेगळ्या योजना तयार केल्या : खा.डॉ. भामरे

**धुळे । प्रतिनिधी**



भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालया अंतर्गत येणा-या केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय-जळगाव ( कार्यक्षेत्र जळगाव धुळे आणि नंदुरबार ) द्वारा केंद्र शासनाच्या ९ वर्षपूर्ती निमित्त केंद्र शासनाचे ९ वर्ष सेवा सुशासन व गरीब कल्याणाची आणि आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष विषयावर चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी रिबीन कट करून व दीपप्रज्वलन करून केले.

यावेळी व्यासपिठावर महापौर, प्रतिभाताई चौधरी, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रकांत पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, प्रदीप पवार, महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळ, धुळे आगाराचे आगार अधीक्षक, मनोज पवार, केंद्रीय संचार ब्युरोचे प्रबंधक, संतोष देशमुख व सहा क्षेत्रीय प्रचार अधिकारी, प्रदीप पवार आदी उपस्थित होते. यावेळी मोदी साहेबांनी तळागाळातील जनसामान्यांचा विचार करून वेगवेगळ्या योजना तयार केल्या व त्याचा लाभ डायरेक्ट त्यांना मिळावा भ्रष्टाचार होऊ नये अश्या उपयोजना केल्या त्यांनी आहेत असे प्रतिपादन डॉ. सुभाष भामरे यांनी केले.

पुढे ते म्हणाले सर्वसामान्य जनतेला मोदी साहेबांनी बँकेच्या योजनेमध्ये सामावून घेऊन डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर स्कीम च्या माध्यमातून केंद्राकडून येणारा पूर्ण पैसा लाभार्थीच्या अकाउंटला जमा होत आहे आणि त्यांनी भरड धान्याचे महत्व यावेळी मांडले.

प्रतिभाताई चौधरी यांनी सर्वांना हे केंद्र शासनाचे ९ वर्ष सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाची व आंतरराष्ट्रीय भरडधान्य या विषयावर आयोजित चित्रप्रदर्शन पाहण्याचे आवाहन सर्व जनतेला केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राकेश गालणकर यांनी, प्रास्ताविक संतोष देशमुख व आभार प्रदर्शन प्रदीप पवार यांनी केले. उद्घाटन कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीताने करण्यात आला.

कार्यक्रमात केंद्रीय संचार ब्युरो तर्फे आयोजित भरडधान्य पाककला स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमात पोस्ट विभाग, पोस्ट पेमेंट बँक, जिल्हा परिषदेचे आरोग्य विभागाचे विविध विभाग, स्वच्छता विभाग, डी आर डी ए चे महिला बचत गट, महिला व बाल विकास विभाग यांच्या माहितीपर व विक्री पर स्टॉलचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता केंद्रीय संचार ब्यूरोचे सहा. क्षेत्रीय प्रचार अधिकारी, प्रदीप पवार, सहकारी प्रिती पवार, बापू पाटिल, किरण कुमार यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नाशिक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडून नाशिक शहर व जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हाध्यक्षपदी रवींद्र पगार, नाशिक शहराध्यक्षपदी रंजन ठाकरे, जिल्हा कार्याध्यक्षपदी विष्णूपंत म्हैसधुणे व गोरख बोडखे यांची तर महाराष्ट्र प्रदेश सामाजिक न्याय विभागाच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी बाळासाहेब कर्डक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. काल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते मुंबई येथील कार्यालयात या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

यावेळी विधानपरिषदेचे माजी सभापती रामराजे निंबाळकर, माजी खासदार समीर भुजबळ, माजी आमदार शिवराम झोले, प्रदेश पदाधिकारी दिलीप खैरे, निवृत्ती अरिंगळे, महिला जिल्हाध्यक्ष प्रेरणा बलकवडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने करण्यात आलेल्या नियुक्त्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हाध्यक्षपदी रवींद्र पगार व शहराध्यक्षपदी रंजन ठाकरे यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. तसेच जिल्हा कार्याध्यक्षपदी विष्णूपंत म्हैसधुणे यांची निवड करण्यात आली असून त्यांच्यावर सिन्नर व देवळाली विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली आहे. तर जिल्हा कार्याध्यक्ष गोरख बोडखे यांच्यावर त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, दिंडोरी, पेठ व सुरगाणा तालुक्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र प्रदेश सामाजिक न्याय विभागाच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी बाळासाहेब कर्डक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# भाजप राबवणार महाजनसंपर्क अभियान :विजय चौधरी यांची माहिती

**नाशिक । प्रतिनिधी**




२०२४ च्या महाविजय अभियानासाठी भारतीय जनता पार्टी महाजनसंपर्क कार्यक्रम राबवणार असल्याची माहिती उत्तर महाराष्ट्र विस्तारकांच्या कार्यशाळेत भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी दिली. ते नाशिक येथे भारतीय जनता पार्टी कार्यालय वसंतस्मृती येथे लोकसभा व विधानसभा विस्तारकांच्या कार्यशाळेत बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र प्रदेश भाजप कार्यालय प्रभारी व उत्तर महाराष्ट्र संघटन महामंत्री रवी अनासपुरे, महाराष्ट्र प्रदेश विस्तारक योजनेचे पालक रघुनाथ कुलकर्णी, भाजप महाराष्ट्र प्रदेश विस्तारक योजनेचे संयोजक कृपाशंकर सिंह, भाजपा प्रदेश सचिव अजय भोळे, सचिन पानपाटील, नाशिक शहर अध्यक्ष प्रशांत जाधव, नाशिक ग्रामीण दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी आदी उपस्थित होते.

विजय चौधरी पुढे म्हणाले की, बूथ रचना ही सशक्त बूथ रचना व्हावी, यासाठी संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी स्वतःला झोकुन घ्यावे व समाजातील सर्व घटकांची सर्वसमावेशक अशी बूथ रचना करावी असे आवाहन केले. यावेळी रघुनाथ कुलकर्णी यांनी विस्तारक योजना व या योजनेतील विस्तारकाची भूमिका यावर मार्गदर्शन केले. तर विस्तार योजनेचे संयोजक कृपा शंकर सिंह यांनी विस्तारकाच्या प्रवासातील कार्यक्रम या विषयावर मार्गदर्शन केले. प्रदेश कार्यालय प्रभारी रवी अनासपुरे यांनी सांगितले की, आपल्याला जे विषय माहित असेल त्याच विषयाची माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी जे विषय माहिती नसेल त्याची चुकीची माहिती जनतेला देऊ नये. या विस्तारकांच्या बैठकीत अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदुरबार व जळगाव जिल्ह्यातील लोकसभा व विधानसभा क्षेत्रातील विस्तारक बहुसंख्येने उपस्थित होते.

# पळासनेर येथील अपघातग्रस्तांना संसारोपयोगी वस्तूंचे वाटप

**शिरपूर । प्रतिनिधी**



तालुक्यातील पळासनेर येथे झालेल्या अपघातात कोळशापाणी, शेमल्या, पळासनेर येथील अपघातग्रस्तांना उद्योगपती तथा शिरपूर टेक्सटाईल पार्क चेअरमन, युवा नेतृत्व चिंतनभाई अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते संसारोपयोगी, दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या वस्तूंचे वाटप करुन संसार उभारण्यासाठी हातभार लावण्यात आला.

पळासनेर येथे ४ जुलै २०२३ रोजी झालेल्या अपघातात कोळशापाणी, शेमल्या, पळासनेर येथील अपघातग्रस्तांना माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आ. काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या वतीने शिरपूर टेक्सटाईल पार्क चे चेअरमन युवा नेतृत्व चिंतनभाई पटेल यांच्या कडून २७ जुलै २०२३ रोजी दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या संसारोपयोगी भांडी, खाट, टॉवेल, ब्लँकेट, विविध वस्तूंचे वाटप करण्यात आले. यापूर्वी माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आ. काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या तर्फे अपघातातील मयताच्या वारसांना प्रत्येकी ३० हजार रुपये आर्थिक मदत तसेच २ महिन्याचा किराणा प्रत्येक कुटुंबाला देण्यात आला होता. तसेच त्यांच्या अथक पाठपुराव्यामुळे १८ दिवसात मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधून मयत झालेल्या परिवारातील वारसदार यांना प्रत्येकी ५ लाख रुपयांचे धनादेश वितरित करण्यात आले होते. त्या नंतर चिंतनभाई पटेल यांनी २७ जुलै रोजी प्रत्येक पिडीतांच्या घरी जाऊन विचारपूस केली. यावेळी जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधी जयवंत पाडवी यांनी परिसरातील लोकांना मार्गदर्शन केले व पटेल परिवार कायम आपल्या सुखा दुःखात सहभागी आहे असे म्हणत आभार मानले.

यावेळी स्विय सहाय्यक अशोक कलाल, जि.प.सदस्य प्रतिनिधी जयवंत पाडवी, जि.प.सदस्य प्रतिनिधी रमण पावरा, पं. स. सदस्य मानसिंग पावर, पं.स.सदस्य यतिष सोनवणे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक जगन पावरा, पळासनेर सरपंच छोटू कोळी, हेंद्रापाडा सरपंच सुनील पावरा, दुर्बड्या सरपंच बिकेश पावरा, दुर्बड्या उपसरपंच साहेबराव पावरा, संजय गिरासे, सुभाष भाऊ, स्विय सहाय्यक सुनील जैन, स्विय सहाय्यक योगेश्वर माळी, संदीप कुवर, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष राज सिसोदिया, तालुकाध्यक्ष आकाश मराठे, मनजीत पवार, रितेश राजपूत, नवल परदेशी, अजिंक्य शिरसाठ, रोशन सोनवणे, भुरा पाटील, नितीन पाटील, विनोद राजपूत, दीपक पावरा, प्रतीक चौधरी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# सिडको फ्री होल्ड करा, कुंभमेळ्यासाठी तातडीची बैठक घ्या

### नगरविकासच्या मागण्यांवर आ.सीमा हिरे यांची विधानसभेत मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**

सिडकोवासियांच्या हिताच्यादृष्टीने सिडको फ्रीहोल्ड करावे, सिडकोचे कार्यालय पूर्वीप्रमाणे पूर्ण क्षमतेने सुरू करावे, अन्यायकारक घरपट्टी रद्द करावी तसेच सिंहस्थ कुंभमेळ्यासंदर्भात तातडीची बैठक लावा आदी आग्रही मागण्या नाशिक पश्चिमच्या आमदार सीमा हिरे यांनी विधानसभेत नगरविकास खात्याच्या पुरवणी मागण्यांवर काल चर्चा करतांना केल्या.

सिडकोच्या सर्व सहा योजना महापालिकेकडे हस्तांतरित झाल्याआहेत. गेल्या टर्ममध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून सिडको फ्री होल्ड असल्याचे जाहीर झाले होते. आता त्याला खूप कालावधी लोटला. मात्र गेल्या एक वर्षांपासून पुन्हा भाजपाप्रणित सरकार सत्तेवर आल्याने नागरिकांच्या आशाही पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. सिडकोला लेखी आदेश जर मिळाले तर सिडको हे फ्री होल्ड होईल आणि नागरिकांना विविध जाचातून मुक्तता मिळेल. नाशिक शहरातल्या या सहाही योजनांना बांधकामची परवानगी देखील सिडकोकडूनच मिळते. त्यामुळे मिळकती फ्रीहोल्ड झाल्याचे जाहीर झाले तर घरे हस्तांतरित करताना मुद्रांक शुल्क वाचणार आहे. त्यामुळे सिडकोवासियांना न्याय मिळण्याकरता नगरविकास विभागाच्या पुरवणी मागण्यावर चर्चा होत असताना याबाबत आपल्याकडे मागणी करत आहे, अशी कळकळीची विनंती आ.हिरे यांनी चर्चेच्यावेळी सभागृहात केली.

सिडकोच्या नाशिक येथील कार्यालयात सुमारे एक कोटीपर्यंत महसूल उपलब्ध होऊनही कार्यालयीन कर्मचाऱ्यांची संख्या ती फक्त दोन ते तीन आहे. त्यामुळे सिडकोवासियांच्या हिताच्या दृष्टीने सदर कार्यालय पूर्ण क्षमतेने सुरू करावे ही आमची कळकळीची मागणी आहे.असेही आ. सीमा हिरे चर्चेच्यावेळी म्हणाल्या.

### पुरमेपाडा मराठी शाळेत वृक्षदिंडी

**धुळे ।** तालुक्यातील पुरमेपाडा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले. वृक्षलागवड करून वृक्षसंवर्धन करणे ही आज काळाची गरज आहे, असल्याच्या घोषणा देत जनजागृती करण्यात आली. या वेळी आव केंद्राचे केंद्रप्रमुख बापू झाल्टे, महेंद्रसिंग सोळंके, ग्रामसेवक पवार, मुख्याध्यापक भारती भदाणे, रणजित लांडगे, भारती पाटील आदी उपस्थित होते. जनजागृती करण्यात आली.

# सुवर्णा देसले यांना पीएचडी

**नाशिक । प्रतिनिधी**



सुवर्णा प्रकाश देसले यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून ग्रंथालय शास्त्र अंतर्गत 'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या वाचन सवयी, सुविधा आणि समस्या' या विषयात पीएचडी प्राप्त केली आहे. या त्यांच्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

सुवर्णा देसले यांनी मराठीत एमए तसेच डीसीएम, एमलिब पुणे विद्यापीठामधून केले आहे. तसेच त्यांनी केटीएचएम व एचपीटी महाविद्यालयातून शिक्षण घेतले आहे. पीएचडी पदवी ही त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून प्रा. डॉ. राजेंद्र कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली मिळवली आहे. यासाठी त्यांना नाशिक जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच प्राथमिक, माध्यमिक शिक्षण अधिकारी, गट शिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी यांचे सहकार्य लाभले. ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे, लोकवाडमय प्रकाशन गृह अध्यक्ष डॉ. भालचंद्र कांगो तसेच के के वाघ शिक्षण संस्थाचे प्राचार्य डॉ भूषण कर्डिले, सरोज जगताप, डॉ. विना ठाकरे, पती कॉ. प्रकाश (राजू) देसले सार्वजनिक वाचनालय नाशिक, कविवर्य नारायण सुर्वे सार्वजनिक वाचनालय नाशिक यांचेही त्यांना सहकार्य लाभले.

# मुकेशभाई पटेल सैनिकी शाळेने विजय दिवसाचे औचित्य साधून शहिदांना वाहिली श्रद्धांजली

**शिरपूर । प्रतिनिधी**





श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ, मुंबई संचलित तांडे येथील मुकेशभाई आर. पटेल मुला-मुलींची सैनिकी शाळा व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात २६ जुलै रोजी कारगिल दिवसाचे औचित्य साधून कारगिल युद्धात शहिद झालेल्या जवानांना कार्यक्रमाचे मुख्य अतिथी तहसीलदार महेंद्र माळी यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करुन श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर प्राचार्य दिनेशकुमार राणा यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन तहसीलदार महेंद्र माळी यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी एस. व्ही. के. एम. क्रीडा संचालक किरण आंचन, क्रीडा उपसंचालक अभय कचरे उपस्थित होते. विद्यालयाचे सैनिकी निर्देशक एस. पी. सोनवणे यांनी कारगिल युद्धातिल शहिदांच्या पराक्रमाच्या गाथा सांगून कारगिल युद्धाच्या इतिहासाशी ओळख करुन दिली. त्यानंतर तहसीलदार महेंद्र माळी यांनी भारत पाकिस्तान यांच्या दरम्यान झालेल्या युद्धांची माहिती सांगून शाळेतील वातावरण व शिस्त याबद्दल कौतुक केले. सैनिकांचे जीवन किती खडतर असते तसेच एका सैनिकाचा जीवन प्रवास कसा असतो अशी अनेक उदाहरणे देत आपले विचार व्यक्त केले. प्राचार्य दिनेशकुमार राणा यांनी देशसेवा हीच खरी ईश्वर सेवा तसेच संरक्षण विभागात अधिकारी म्हणून शाळेच्या विद्यार्थ्यांनी भूमिका बजवावी अशी अपेक्षा व्यक्त केली. कारगिल दिवसाचे औचित्य साधून ईन्वेस्टीचर सेरेमनी ज्याद्वारे विद्यार्थी प्रतिनिधी नियुक्ती केली जाते त्या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. त्याद्वारे विविध विभागात उत्तम कामगिरी बजावणाऱ्या विद्यार्थ्यांना पदभार देऊन सन्मान करण्यात आला. सदर सोहळ्याचे आयोजन क्रीडा समन्वयिका श्रीमती ज्योत्स्ना जाधव, क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर माळी यांनी मुख्य भूमिका बजावली. मुख्य विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून विद्यार्थी चेतन दगडू दोरिक, मुख्य विद्यार्थिनी प्रतिनिधी मधुली प्रीतम कुमार सरागे, उपमुख्य विद्यार्थी प्रतिनिधी यश जितेंद्र पाटील, उपमुख्य विद्यार्थिनी दिशा हरीश मदानी, क्रीडा प्रमुख कुणाल दिनेश परदेशी, उपमुख्य सिमोन मनीष शिरसागर यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्तीपर गीत गाऊन सर्वांना मंत्रमुग्ध केले. प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सैनिकांना समर्पित गीत सादर केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी तनिष्का गुरव तसेच रुचिका देवरे यांनी केले. शिक्षिका श्रीमती दीपश्री गोसावी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798
ज्ञानगंगा घरोघरी
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक लक्ष महाराष्ट्र





मंगळवार, दि. १ ऑगस्ट २०२३

# भिमस्मृतींना उजाळा देण्यासाठी उसळला जनसागर


























धुळे

। मुंबई- आग्रा महामार्गावरील लळिंग (ता. धुळे) कुरणातील ऐतिहासिक लांडोर बंगला येथे सोमवारी (ता. ३१) आंबेडकरी अनुयायींचा जनसागर लोटला. भीमस्मृती यात्रेनिमित्त दिवसभर विविध कार्यक्रम पार पडले. न्यायालयीन कामकाजानिमित्त येथे आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३८ मध्ये लांडोर बंगल्यास भेट दिली होती. त्यांच्या या आठवणींना उजाळा देण्यासाठी ३० वर्षांपासून लांडोर बंगलास्थळी दरवर्षी ३१ जुलैला भीमस्मृती यात्रा भरते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ३१ जुलै १९३८ मध्ये न्यायालयीन कामकाजासाठी शहरात आले होते. त्या वेळी त्यांनी लांडोर बंगला येथे मुक्काम केला होता. त्यांची आठवण स्मरणात राहावी, यासाठी माजी प्राचार्य स्व. जे. जी. खैरनार यांच्यासह काही कार्यकर्त्यांनी भीमस्मृती यात्रा भरविण्यास सुरवात केली. हा उपक्रम अखंडित सुरू आहे. यावेळी आ.फारूक शाह, पोलिस अधिक्षक संजय बारकुंड, ज्येष्ठ नेते शशिकांत वाघ, संजय बैसाणे, राज चव्हाण, राजु शिरसाठ, आबा खंडारे, संजय बैंसाणे, नैना दामोदर, बानु शिरसाठ, सिध्दार्थ जगदेव,मिलींद बैसाणे,ॲड.मधुकर भिसे, यांच्यासह विविध पक्ष- संघटनांकडून डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या या आठवणींना उजाळा देण्यासाठी लांडोर बंगलास्थळी दरवर्षी ३१ जुलैला भीमस्मृती यात्रा भरते. भीमस्मृती यात्रेचे हे ३० वे वर्ष आहे. सकाळपासूनच आंबेडकरी अनुयायींनी लळींग कुरणातील ऐतिहासिक लांडोर बंगला येथे गर्दी केली. धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक जिल्ह्यासह शेजारील गुजरात, मध्यप्रदशोतूनही अनुयायी दाखल झाले.. मोहाडी पोलिस ठाण्यातर्फे ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांसाठी लांडोर बंगला येथे जाण्यासाठी वाहनाची व्यवस्था करण्यात आली होती. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (खरात) पक्षातर्फे अन्नदान व वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला. तर लांडोर बंगला मध्यवर्ती समितीतर्फे प्रबोधनात्मक गायनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

संकलन : दिपक वाघ





# केंद्र शासनाच्या ९ वर्ष पूर्ती व आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष विषयावर छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन

















धुळे । केंद्र शासनाच्या ९ वर्ष पूर्ती व आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष निमित्त भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालय, केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय-जळगाव द्वारा जिल्हा प्रशासन, नेहरू युवा केंद्र व राज्य परिवहन महामंडळ, धुळे विभाग यांच्या सहकार्याने दिनांक २९ ते ३१ जुलै २०२३ दरम्यान देवपुर बस स्थानक, धुळे येथे केंद्र शासनाच्या ९ वर्ष पूर्ती व आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष या विषयावर छायाचित्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्धटन शनिवार २९ जुलै २०२३ रोजी सायंकाळी ५:०० वाजता खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्या हस्ते झाले आहे. या प्रदर्शनात केंद्र शासनाच्या ९ वर्ष पूर्ती व आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष यावर माहिती सांगणारे सचित्र छायाचित्र, तसेच एलईडी टी.व्ही वर चित्रफीतद्वारे माहिती दाखविण्यात येईल. तसेच पोस्ट ऑफिस अंतर्गत चालणाऱ्या योजनांची माहिती,जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता विभाग यांच्या कामांची माहिती तसेच प्रदर्शन स्थळी नेहरु युवा केंद्र व राज्य परिवहन महामंडळ,धुळे विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे माहितीपर स्टॉल लावण्यात आले असून हे प्रदर्शन २९ ते ३१ जुलै २०२३ (०३ दिवस) पर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य उपलब्ध असणार आहे. चित्रप्रदर्शानाच्या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम, विविध पाककला स्पर्धा आदीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या प्रदर्शनाला मोठया संख्येने नागरीकांनी भेट देऊन केंद्र शासनाच्या ९ वर्ष पूर्ती व आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षाची माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन केंद्रीय संचार ब्यूरो, जळगावचे प्रबंधक संतोष देशमुख यांनी केले. खासदार सुभाष भामरे म्हणाले की सर्वसामान्यांच्या हिताचे हे सरकार काम करीत असून आदिवासी दलित सर्वसामान्य अशा घटकांसाठी मोदी सरकारने विविध योजना आणल्या असून त्यातून त्या परिवाराचा सर्वांगीण विकास घडवून आणायचा आहे.

संकलन : दिपक वाघ